# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६
## (सकाळी ०९-४५ ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक - १ ते ३)**

**(१) श्री. सत्यजित देशमुख, डॉ. विनय कोरे, श्री. निलेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शिराळा विधानसभा मतदारसंघ परिसरासह लगतच्या तालुक्यातही बिबटयांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन मानवी वस्तीत मोठया प्रमाणात शिरकाव झालेला असल्याचे निदर्शनास येणे, बिऊर (ता.शिराळा) येथे ६ वर्षाच्या बालकाची बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडली असणे, सदर घटनास्थळी वन विभागाचे अधिकारी वेळेत हजर न झाल्याने संतप्त जमावाने वन विभागाच्या कार्यालयाची नासधूस करणे, शिराळा कार्यालयातील वनक्षेत्रपाल पारधी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करणे, नरभक्षक बिबटयास त्वरीत ठार/जेरबंद करण्याची मागणी नागरीकांनी प्रशासनाकडे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केलेली असणे, उक्त ठिकाणी बिबटया लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असल्याच्या वारंवार घटना घडत असल्याने नागरीकांची जिवीतहानी व मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, गव्यांच्या हल्ल्यांच्या घटना वारंवार घडत असणे, सदर ठिकाणच्या वन्य प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्याने मानवी जिवीतास मोठा धोका निर्माण झाल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झालेले असणे, त्यानुषंगाने बिबटयांपासून पूर्णत: संरक्षण होणेकामी त्यांना पकडून त्यांच्या मूळ अधिवासात सोडणे, निर्बिजीकरण करणे, सापळे लावणे, ठार मारण्याची परवानगी मिळणे, स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाना, सद्य:स्थितीत बिबट्याचा वावर पूर्णत: मानवी अधिवासात असल्याने शेड्युल १ मधून शेड्युल २ मध्ये समावेश करण्याची आवश्यकता असल्याबाबतची मागणी मा.वने मंत्री व स्थानिक प्रशासनाकडे वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, सदर बाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असणे, उक्त प्रकरणी शासनाकडून सत्वर चौकशी करुन संबंधित दोषींना निलंबित करणे, मृतांच्या कुटूंबियांना तसेच जखमींना उपचाराकरीता त्वरीत आर्थिक मदत देणे, तसेच उक्त ठिकाणच्या वन्य व हिंस्त्र प्राण्यांचा वाढता प्रादुर्भाव कायमस्वरुपी रोखण्याकरीता शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री. सिध्दार्थ खरात, चेतन तुपे, प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, मनोज कायंदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवराची पाणी पातळी गेल्या ६ महिन्यांपासून सातत्याने वाढत असणे, कमळजा मातेचे मंदिर आणि गैबनशहा दर्गा तसेच इतर प्राचीन मंदिरे पूर्णत: पाण्याखाली जाणे, लोणार सरोवराच्या पाणी पातळीत २० ते २५ फुटांची लक्षणीय वाढ होणे, अशीच स्थिती कायम राहिल्यास सरोवराचे रुपांतर सामान्य तलावात होऊन पर्यटन व स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, सातत्याने वाढणा-या पाणी पातळीवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी लोणार शहर कडकडीत बंद ठेवण्यात येणे, लोणार सरोवरातील नैसर्गिक समतोल राखून त्याचे वैभव अबाधित ठेवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये पाणी पातळी वाढीसंदर्भात चौकशी व उपाययोजना करण्यासाठी माहे जानेवारी, २०२६ मध्ये आ.आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणे, सदर समितीने अद्यापही कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना न करणे, तसेच लोणार सरोवराच्या विकासासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व मा.न्यायमूर्तींच्या देखरेखीखाली गठीत करण्यात आलेल्या "लोणार सरोवर व संवर्धन समिती" मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदर समितीच्या कामकाजाबाबत स्थानिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, उक्त समितीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. संदिप क्षीरसागर, श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बीड व शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातून जाणारा खरवंडी –ब्रम्हनाथ येळंब- आर्वी –खालापुरी –नवगन राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ या रस्त्याच्या कामाकरिता १९९ कोटी रुपयांची मान्यता माहे जून,२०१८ मध्ये आदेश देऊन १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असताना सात वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, सदर रस्त्याकरिता भूसंपादन अद्याप पूर्ण झाले नसल्याने ब्रम्हनाथ येळंब, मुंगूस वाडी जांब व नवघन राजुरी या गावांमधील रस्त्यांची कामे अदयापही रखडलेली असणे, तसेच भूसंपादन बाधितांना अदयाप जमिनीचा मोबदला मिळालेला नसणे, भूसंपादन व रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने कामाच्या किंमतीमध्ये झालेली वाढ,परिणामी ९ कोटींचा वाढलेला अधिकचा खर्च, रस्त्याच्या भूसंपादनास विलंब झाल्यामुळे शासनाला आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई

करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मिराभाईंदर क्षेत्रात MMRDA मार्फत अनेक विकास कामे प्रगतीपथावर असणे, त्यापैकी जे. कुमार या ठेकेदाराने कामासाठी आवश्यक कास्टिंगयार्डची मौ.चेणा सर्व्हे क्र१४१,१४३ व इतर येथे उभारणी करणे, सदरची जागा ही जे.कुमारच्या मालकीची असून येथील काही जागा इकोसेन्सिटिव्ह झोन व आदिवासी आरक्षणाने बाधित असणे, इकोसेन्सिटिव्ह झोन तथा आदिवासी विभागाची कोणतीही परवानगी न घेता स्वतःच्या मालकीची जागा असून देखील या ठेकेदाराने MMRDA कडून जेथे जमिनीच्या विक्रीचे बाजार मूल्य २० करोड रुपये असताना तेथे तब्बल ८० करोड रुपये भाडे स्वरूपात एम.एम.आर.डी.ए.कडून वसूल करणे, तसेच या ठेकेदारास दहिसर मेट्रो स्थानकाची मूळ निविदा ६० कोटींची असताना त्यात वाढीव दर देऊन सुप्रमा न देता तब्बल १२० कोटींची निविदा काढून काम देणे, प्रत्यक्षात मेट्रो ९ चे काम २०२३ ला पूर्ण होणे अपेक्षित असताना २०२६ उजाडून देखील काम पूर्ण न होणे, काम पूर्ण न होऊन देखील त्यांच्यावर अद्याप कोणताही दंड न आकारता वाढीव रक्कम MMRDA कडून देण्यात येणे, मेट्रोच्या खाली बांधण्यात आलेला समांतर उड्डाणपूल देखील निविदेच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा जास्त दराने तसेच सदर उड्डाणपुलाच्या ठरलेल्या नियोजित नकाशांमध्ये परस्पर बदल करून MMRDA मार्फत जे.कुमार या ठेकेदाराला देण्यात येणे, अवाजवी घेतलेली भाड्याची रक्कम, कामात केलेली दिरंगाई, मूळ निवेदीच्या रकमेत झालेली वाढ, निविदा न देता करण्यात आलेले उड्डाणपुलाचे काम, यामुळे शासनाचे झालेले नुकसान याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. सुनिल शेळके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत सुमारे ९,९०० एकर क्षेत्र येत असून, २०२१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४८ हजार ९६३ होती, परंतु सद्यस्थितीमध्ये सदर लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असणे, सदर भागातील विकासकामांसाठी केंद्र सरकारकडून कोणताही निधी प्राप्त होत नसताना येथील जकात कर आणि प्रवेश शुल्क बंद झाल्याने बोर्ड आर्थिक संकटात असणे, कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले जात नसून पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, पथदिवे, औषध फवारणी अशा मूलभूत गरजांबाबत नागरिक त्रस्त असणे, राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामांकरिता आजतागायत भरघोस निधी मंजूर झाला असून सदर विकासकामांना कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने मंजूर विकासकामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असणे, स्थानिक नागरिकांकडून सदर कॅन्टोन्मेंट बोर्ड बरखास्त करुन येथे स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याची तीव्र मागणी होत असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, परिणामी सदर भागातील नागरिकांना सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असून सदर गंभीर बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे

नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी निर्माण झालेला असंतोष याप्रकरणी शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. करण देवतळे, देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"अनेक वर्षांपासून विदर्भ मल्टीसर्व्हिसेस ही कंपनी नगरपरिषद वरोरा, जि.चंद्रपूर मध्ये पाणीपुरवठ्याची देखभाल दुरुस्तीची कामे करीत असणे, गेल्या दीड वर्षांपूर्वी पालिकेच्या दुषित पाणीपुरवठ्यामुळे मालवीय वॉर्ड येथील एका चार वर्षीय बालकाचा मृत्यू झाला असणे, तसेच दुषित पाणी पिण्यामुळे शहरातील अनेक नागरिकांना साथीच्या रोगांची लागण होऊन शहरातील आरोग्याची समस्या बिकट झाली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले असणे, त्यामुळे विदर्भ मल्टीसर्व्हिसेस कंपनीविरुद्ध पोलीसांत गुन्हा दाखल झाल्यामुळे या कंपनीला त्वरित काळ्या यादीत टाकण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली असणे, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, शासनाने तात्काळ सदरहू कंपनीला काळ्या यादीत टाकून कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या उद्यान, मैदाने, नाले तसेच आरक्षित असलेल्या भूखंडांवर भूखंड माफियांनी सर्रासपणे अनधिकृत बांधकामे उभारली असणे, तसेच सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या सामाजिक सेवेच्या आरक्षित असलेल्या अशा अनेक भूखंडावर अनधिकृत बांधकाम करणे म्हणजे एक प्रकारे गुन्हा असणे, ज्या आरक्षित भूखंडांवर भूमाफियांनी गोडाऊन, भंगाराचे दुकान, नर्सरी, ढाबे असे विविध प्रकारचे उत्पन्न निर्माण करणारे अनधिकृत बांधकाम उभारले असणे, नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकी जागेवर अनेक अनधिकृत बांधकामे झाली असणे, तसेच भूमाफियांनी सर्व नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकामांचा सपाटा लावला असणे, सिडको प्रशासनाने व नवी मुंबई महानगरपालिकेने किती अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली व कधी केली, सदर अनधिकृत बांधकामांमध्ये कोण कोणत्या आजी माजी नगरसेवकांची नावे आहेत, त्याचबरोबर या अनधिकृत बांधकामांना शह देण्याकरिता संबंधित अधिकारी यांचे पाठबळ असणे हे तपासणे अत्यंत महत्वाचे असणे, याबाबत सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आरक्षित असलेल्या भूखंडांवर अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या भूमाफिया व अधिकाऱ्यांवर शासनाने कायदेशीर कारवाई करण्याची गरज, तसेच नवी मुंबईकरांना या अनधिकृत बांधकामांच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरीता व अनधिकृत बांधकामधारकांवर व त्याला जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चेंबूर येथील न. भूक्र. ४६९- अ महाराष्ट्र शासनाच्या शासकीय जागा बांधा, वापरा, हस्तांतर करा या तत्त्वावर सध्याच्या हब टाऊन या खाजगी कंपनीला ज्या अटी आणि शर्तीवर देण्यात आली त्या सर्व अटी आणि शर्तींचे सदरच्या खाजगी विकासकाच्या कंपनीने उल्लंघन केले असणे, अटी व शर्तींनुसार सदर विकासकामे सर्वप्रथम सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम करून देणे क्रमप्राप्त असणे, त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह व इतरही शासकीय कार्यालयांच्या इमारतींचा समावेश असणे, परंतु सर्व इमारतींचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरु असणे, कधी कधी तर ते बांधकाम बंदच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, या विकासकाने सदरचे बांधकाम बंद ठेऊन त्याने त्याच्या स्वतःच्या विक्री करता असलेल्या इमारतीचे व त्यामधील व्यापारी गाळे या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून स्वतःचा फायदा केला असणे, शासकीय इमारतींचे अटी आणि शर्तींनुसार सदर काम विहीत कालावधीत पूर्ण करून देणे क्रमप्राप्त असणे, भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहाचे बांधकाम हे विकासक पूर्ण करत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब असणे, त्यांनी शासकीय जागा ज्या अटी व शर्तींवर विकास करण्यासाठी घेतलेली आहे त्यांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) सर्वश्री. विठ्ठल लंघे, हेमंत ओगले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील सन १९९२ पासून मंजुरी प्राप्त बेलापूर (श्रीरामपूर)-परळी प्रस्तावित रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण होऊन जून, २०२२ मध्ये अहवाल रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आलेला असताना, केवळ २.५५ टक्के RoR दाखवत दिनांक २६ सप्टेंबर २०२२ रोजी केंद्र शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली असणे, राज्य शासनाने २०१९ मध्येच ५० टक्के आर्थिक सहभागाचे पत्र दिले असून सहभागानंतर RoR उणे ०.८७ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहील असे स्पष्ट करण्यात आलेले असतानाही प्रकल्प प्रलंबित ठेवण्यात येणे, परिणामी हा भागातील जनतेवर अन्याय करणारा निर्णय असल्याची भावना तीव्र होणे, अ.नगर-बीड-परळी, बारामती-लोणंद-फलटण, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव हे तोट्यातील प्रकल्प मंजूर असताना सदर मार्ग स्थगित ठेवण्यात येणे, या प्रकल्पासाठी उपोषणे व तीव्र आंदोलन झालेले असून मा. मुख्यमंत्री यांनीही पाठपुराव्याचे आश्वासन दिलेले असताना देखील अद्याप ठोस प्रगती न झाल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावरील स्थगिती उठवून प्रकल्पास तात्काळ मंजुरी देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०२२ ते सन २०२४ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा, एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग मंत्री** : **(क)** पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री. सुहास बाबर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी, तासगाव, जत तसेच सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात अनेक गलाई बांधव कारागीर हे पिढ्यानपिढ्या देशभरातील विविध शहरांमध्ये सोने-चांदी रिफायनरी व सराफी व्यवसायात वस्तू निर्मितीचे काम करत असणे, देशभरात अंदाजे २ लाख प्रत्यक्ष व १० लाख अप्रत्यक्ष कामगारांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून असणे व कोट्यवधी रुपयांचा महसूल शासनाकडे जमा होत असणे, असे असतानाही जुना आयपीसी कलम ४११ तसेच नव्या बीएनएस कलम ३१७ अंतर्गत चोरीसंदर्भातील तरतुदींचा अवाजवी वापर करून पोलिसांकडून सातत्याने त्रास दिला जात असणे, शासन निर्णयानुसार चौकशी प्रक्रियेची अंमलबजावणी होत नसणे, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर संयुक्त समन्वय समिती स्थापन न झाल्याने व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, तसेच या व्यवसायास लघुउद्योगाचा दर्जा नसल्याने कर्जसुविधा व संरक्षणात्मक उपाय मिळण्यात अडचणी येत असणे, या सर्व बाबींचा विचार करून

संबंधितांना लघुउद्योग दर्जा देणे, समन्वय समित्या स्थापन करणे व पोलिस कारवाईस स्पष्ट मार्गदर्शक तत्वे लागू करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आधी नंदापूर मग पंढरपूर" अशी ख्याती असलेले नंदवाळ हे प्रतिपंढरपूर म्हणून सर्व राज्यांमध्ये परिचित असणे, प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला या ठिकाणी अंदाजित पाच लाखाहून अधिक प्रमाणात वारकरी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून भेट देत असणे, सदर दिंडी सोहळ्यामध्ये "गोलरिंगण सोहळ्याचे" आयोजन होत असणे, सदर सोहळ्याकरिता आवश्यक असणारी जागा नंदवाळ येथील गायरान गट क्र. ६३ मधील ४६ हेक्टर जमीन, भारत राखीव बटालियन क्र. ३ व राज्य राखीव पोलीस बल यांना देणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी झालेला असणे, परंतु सदर निर्णयास नंदवाळ ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी सदरची जागा बटालियनला देणेसाठी तीव्र विरोध करणे, याबाबत वारंवार आंदोलनेही झाली असून तत्कालीन मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे दिनांक १९ मे, २०२३ रोजी बैठक झाली असणे, यामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने गायरान गट क्र. ६३ मधील ५० एकर जागा गांवासाठी राखीव ठेवणेबाबत सूचना केल्या असणे, भाविकांना या जागेवर रिंगण सोहळ्याकरिता भारत बटालियनकडून विरोध झाला असणे, लोकप्रतिनिधींवर केसेस सुद्धा झालेल्या असणे, याबाबत सतत पाठपुरावा करुन देखील अद्याप गेल्या दोन ते अडीच वर्षामध्ये पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी ग्रामस्थ व वारकरी भाविकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. राजु तोडसाम, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील १३ पेसा क्षेत्राबहुल जिल्ह्यांतील आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी राज्य सरकारने सरळसेवा भरतीची जाहिरात काढून संबंधित विभागांना त्या ठिकाणी पदभरती करण्याची निर्देश दिले असणे, या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र.६४८७२/२००५, दि.१७.११.२०२५ व विशेष अनुज्ञा याचिका क्र.२२१०९/२०२३, दि.६.१०.२०२५ अन्वये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीबाबत शासन निर्णयाद्वारे सूचित करणे, परंतु राज्यातील अनेक जिल्ह्यांत अनुशेष असताना, आरक्षणाची बिंदुनामावली निश्चित नसणे, काही जिल्ह्यांतील प्रशासकीय अधिकारी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करणे, काही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबत शाशंक असणे, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरसुद्धा अद्यापपर्यंत पदभरती न होणे, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित

क्षेत्रातील १७ संवर्गांपैकी केवळ ९ संवर्गांची पदभरती करणे, सदर पदांसोबतच राज्य शासनाने वेळोवेळी निर्देश केलेल्या सरळ सेवा पदभरतीची परीक्षा उत्तीर्ण असताना पेसा क्षेत्रातील उमेदवारांना जाणीवपूर्वक मागील ३ वर्षांपासून मानधन तत्वावर ठेवणे, त्यामुळे त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर अन्याय होणे, ही बाब राज्यातील १३ जिल्ह्यांतील १७ संवर्गांतील उमेदवारांवर अतिशय अन्यायकारक असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील** :-

"मे.ज्ञानप्रकाश शुल्का एलएलपी यांनी जोगेश्वरी, पूर्व, मुंबई येथील सीटीएस क्र ४५ व ४८ येथील जमिनीवर केलेल्या गंभीर अनियमित बाबी व जाणीवपूर्वक चुकीचे सादरीकरण करुन अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, एसआरएचे नकाशे मंजूर करतांना त्यात अंतर्गत ९ मिटर रुंदीचा डीपी रस्ता दाखविण्यात येणे, परंतु प्रत्यक्षात केवळ ६ मिटरचा रस्ता असतांना अग्निशमन विभागाद्वारे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येणे, यांसदर्भात दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या सुमारास मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन कार्यालय, मरोळ, अंधेरी, मुंबई यांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन देणे, या निवेदनानुसार अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **डॉ. राहूल पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी महानगरपालिकेला जकात अनुदान माहे सप्टेंबर, २०१६ करिता नगरपालिका संचालनालय यांचे दिनांक १० जून, २०१६ च्या आदेशान्वये दरमहा १,९० कोटी येणे, शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवाकर अधिनियम, २०१७ मधील कलम ४ नुसार सन २०१६-१७ हे वर्ष आधारभूत वर्ष (Base Year) घोषित करुन कलम ५ नुसार आधारभूत वर्षाचा महसूल ठरवण्यात येणे, दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून शासनाने रुपये ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापारी आस्थापनांना स्थानिक संस्था करामधून सूट देणे, परंतु महानगरपालिका क्षेत्रात केवळ २ व्यापारी आस्थापना असणे, महागाई वाढ लक्षात घेता जकात अनुदानामध्ये वाढ होणे अपेक्षित असणे, त्याऐवजी दरमहा ३६ लक्ष रुपये अनुदान कमी करणे, त्यामुळे ४ महिन्यांचे कर्मचारी वेतन व १५ व्या वित्त आयोगाचे हफ्ते थकीत असणे, परिणामी कर्मचा-यांमध्ये असंतोष निर्माण होणे, आर्थिक वर्षामध्ये वसूली माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या कालावधीमध्ये कराची वसूली जास्त प्रमाणात होणे, परंतु याच काळात शासनाने कर वसुलीला स्थगिती दिल्यामुळे आधारभूत वर्षातील वसुली कमी होणे, वसुलीची स्थगिती दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी उठविणे, तोपर्यंत परभणी मनपाला वस्तू व सेवाकर अनुदान रक्कम निश्चित न झाल्यामुळे महानगरपालिका आर्थिक विवंचनेमध्ये सापडणे, परभणी

महापालिकेने माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये अनुदानाची थकीत रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करण्याची विनंती शासनाकडे केलेली असणे, शासनाने सदर प्रकरणी केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(६) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरात विशेषतः बोरिवली विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कांदळवनांची बेकायदेशीर तोड, अनधिकृत भरणी (Land Filling) आणि त्यावर मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली येणे, कांदळवने ही मुंबईसाठी नैसर्गिक संरक्षक भिंत असून पूरस्थितीपासून संरक्षण, समुद्राच्या भरती-ओहोटीचा परिणाम कमी करणे व पर्यावरणीय संतुलन राखणे महत्वाचे असणे, मात्र काही भू-माफिया व बिल्डर लॉबी यांच्या संगनमताने रात्रीच्या वेळी मलबा टाकून भरणी केली जात असल्याच्या स्थानिक नागरिकांच्या वारंवार तक्रारी असतानाही महापालिका, पोलीस प्रशासन व वन विभाग यांचे दुर्लक्ष होणे, कांदळवन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाडांची तोड व माती/मलबा टाकून भरणी, अनधिकृत बांधकामांना स्थानिक स्तरावर मूकसंमती, भविष्यात पूरस्थिती व पर्यावरणीय आपत्तीचा गंभीर धोका निर्माण झालेला असणे, मुंबईचे पर्यावरण वाचवणे आताच्या घडीला नितांत आवश्यक असून कांदळवनांचे रक्षण झाले नाही तर भविष्यात मुंबईला भीषण पूरस्थिती व पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागणार असल्याची भिती निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(७) श्री. अबू आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये अनेक वर्षापासून एस.एम.एस. इंव्होक्लीन बायो वेस्ट कचरा जाळणारी कंपनी व आर.एम.सी. सिमेंट प्लांट कार्यरत असणे, सदर कंपनीमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणे, सदर कंपनी बंद करण्यात यावी याकरिता २००९ पासून विधानसभेत व सर्वच माध्यमातून वारंवार मागणी करण्यात येणे, सन २०१९ मध्ये कंपनी विरोधात आंदोलन करणे, तेथील नगरसेवक यांना अटक करणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्राद्वारे कंपनी ५० टक्के क्षमतेने चालू ठेवून उर्वरित कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठवण्याचा आदेश देणे, दीर्घकालीन उपाययोजनांकरीता २०२२ पर्यंत खालापूर, रायगड या जागेमध्ये कंपनी सुरु करण्यात येत असल्याचे पत्राद्वारे कळविणे, तत्कालीन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांचेद्वारे सदर विषयी संयुक्त बैठक दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी घेण्यात येणे, परंतु कंपनी स्थलांतरित न होणे व त्याचे काम पूर्ण क्षमतेने सुरु असणे, कंपनीचा कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठविण्याकरिता निवेदन केले असता वाहतुकीसाठी जास्त खर्च येत असल्याचे सांगून टाळाटाळ करणे, विद्यमान पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी सदर विषयी बैठक घेण्याचे

आश्वासन देऊनही बैठक न घेणे, दोन्ही कंपन्या बंद करण्याबाबत वारंवार मागणी करूनही कोणतीही कारवाई न होणे, सदर प्रकरणी जनसामान्यांमध्ये वाढलेला असंतोष, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील कृषी क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत 'फार्मर आयडी' अनिवार्य करण्यात आला असून, शासनाच्या बहुतांश कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी हा आयडी आधारभूत मानला जात असल्याचे अलीकडेच दिसून येणे, परंतु गेवराई विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये मोठ्या प्रमाणावर तांत्रिक विसंगती निर्माण झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या ८-अ वरील प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा फार्मर आयडीवर कित्येक पटीने जास्त क्षेत्र दर्शविले जाणे, नावात चुका असणे, जमिनीचा गट क्रमांक चुकीचा असणे किंवा एकाच शेतकऱ्याच्या नावावर इतरांच्या जमिनीची नोंद होणे, अशा गंभीर चुकांचा समावेश असणे, सदर तांत्रिक त्रुटींमुळे विविध शासकीय अनुदानांपासून पात्र शेतकरी तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची व चिंतेची भावना असणे, विशेष म्हणजे या किरकोळ चुका दुरुस्त करण्यासाठी सध्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मंडळ अधिकारी किंवा तहसील स्तरावर कोणतीही तांत्रिक सुविधा वा अधिकार उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना जिल्हा मुख्यालयी हेलपाटे मारावे लागत असणे, शासकीय पोर्टलवरील या तांत्रिक बिघाडामुळे प्रत्यक्ष शेतकरी हवालदिल झाला असून, खरीप व रब्बी हंगामातील लाभांपासून तो वंचित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, यावर तातडीने उपाययोजना म्हणून फार्मर आयडी दुरुस्तीचे अधिकार स्थानिक महसूल व कृषी स्तरावर प्रदान करणे आणि यासाठी विशेष मोहीम राबवून चुका दुरुस्त करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. विलास भुमरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि., एकनाथ नगर हा कारखाना सन २०१५ पासून मे. सचिन घायाळ शुगर प्रा. लि. या कंपनीस त्रिपक्षीय कराराद्वारे १८ गाळप हंगामांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेला असणे, करारानुसार सर्व देणी व एफ.आर.पी. रक्कम अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची असताना उस गाळप हंगाम २०२४-२५ मधील शेतकऱ्यांची एफ.आर.पी. रक्कम अद्याप न देणे, तसेच शासनाची पूर्वपरवानगी न घेता कारखान्याची मालमत्ता तारण ठेवून सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज उचलणे, त्यातील १६.१३ कोटी रुपयांच्या वापराबाबत लेखापरीक्षण अहवालात स्पष्ट नोंद नसणे, बनावट सभासद नोंदी व संस्थापक सभासदांना

वगळणे, तसेच विशेष लेखापरीक्षकांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याची शिफारस करूनही त्यावर कार्यवाही न होणे, यामुळे कारखान्यातील सहकार क्षेत्रात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत संबंधित संचालक मंडळ बरखास्त करणे, भाडेकरार रद्द करणे व दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस)**

(१) गृह विभाग

(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) जलसंपदा विभाग

(४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(६) मृद व जलसंधारण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सात : (बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सामंत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे,**

**अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी **'AI for Agri २०२६'** ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : (बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे,**

**प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे,

त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत पूर्ण करुन आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता, राज्यात विशेषत: ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात काँक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : (बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, चेतन तुपे, योगेश सागर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, राजकुमार बडोले, प्रविण दटके, दिपक केसरकर, शेखर निकम, अतुल भातखळकर, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री प्रतापराव पाटील-चिखलीकर, संभाजी पाटील-निलंगेकर, राजेंद्र गावित, संजय बनसोडे, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे, राजेश विटेकर, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. संजय उपाध्याय, डॉ. बालाजी किणीकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मोहन मते, विलास तरे, शंकर मांडेकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री चंद्रदीप नरके, प्रकाश सोळंके, प्रकाश सुर्वे, अतुलबाबा भोसले, नरेंद्र भोंडेकर, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, अभिमन्यु पवार, किशोर पाटील, रविंद्र चव्हाण, रविशेठ पाटील, निलेश राणे, संजय केळकर, तुकाराम काते, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अशोक पाटील, कृष्णा खोपडे, शरददादा सोनावणे, महेश बालदी, बालाजी कल्याणकर, महेश लांडगे, सुहास कांदे, शंकर जगताप, श्रीमती मंजुळा गावित, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री महेंद्र थोरवे, करण देवतळे, महेंद्र दळवी, पराग शाह, चंद्रकांत पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री संतोष बांगर, बबनराव लोणीकर, विश्वनाथ भोईर, प्रशांत बंब, राम कदम, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर, महेश शिंदे, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री आमश्या पाडवी, अनुपभैय्या अग्रवाल, हिकमत उढाण, विक्रम पाचपुते, बाबुराव कदम-कोहळीकर, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री अमोल खताळ, सुरेश भोळे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, राहूल कुल, मुरजी पटेल, देवेंद्र कोठे, अमोल पाटील, सत्यजित देशमुख, सुहास बाबर, समीर कुणावार, राजेश मोरे, देवराव भोंगळे, विठ्ठल लंघे, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री किरण सामंत, नारायण कुचे, शिवाजी पाटील, प्रताप अडसड, मंगेश चव्हाण, डॉ. अशोकराव माने, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सुनिल कांबळे, अमल महाडिक, सचिन कल्याण-शेट्टी, प्रकाश भारसाकळे, चरणसिंग ठाकूर, बंटी भांगडिया, राजेश पवार, श्रीमती अनुराधा चव्हाण, श्री. विनोद अग्रवाल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री किसन कथोरे, राजन नाईक, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, श्वेता महाले, श्री. सुरेश धस, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, मनोज घोरपडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, सर्वश्री राजु तोडसाम, प्रविण तायडे, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री राजेश बकाने, तानाजी मुटकुळे, जितेश अंतापुरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. नरेंद्र मेहता, सर्वश्रीमती स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री हरिश्चंद्र भोये, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व दिवंगत उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन अर्थमंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व

गृहनिर्माण मंत्री यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावर हाऊस' झाले असणे, यापैकी ८३ टक्के करारामध्ये १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे मुंबईतील पाणी, हवा यांचे प्रश्न सोडविणे शक्य होणार असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा दावोसमध्ये करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, ग्रीन हायड्रोजन क्षेत्रात राज्याने तब्बल ५ लाख कोटींचे करार केले असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, गडचिरोली ते नागपूर पर्यंतचा पट्टा पोलाद आणि अक्षय ऊर्जेचे हब बनणार असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, त्याकरिता वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात आले असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करुन विद्युत गाड्यांच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यात आले असणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, या कराराद्वारे प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १ मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकिय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमतेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याचा होत असलेला प्रयत्न आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अकरा : **सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पवार, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री संदिप क्षीरसागर, दिलीप सोपल, अमिन पटेल, बापूसाहेब पठारे, अजय चौधरी, संजय मेश्राम, रोहित पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नारायण पाटील, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अभिजीत पाटील, संजय पोतनीस, अमित झनक, राजू खरे, नितीन देशमुख, विकास ठाकरे, वरुण सरदेसाई, शिरीषकुमार नाईक, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर,**

**बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी M/S VSR Ventures Pvt. Ltd. संचालित खाजगी विमानाच्या अपघातात राज्याचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या संपूर्ण अपघाताची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, पिंपरी चिंचवड येथे बलात्कार, खून, चोरी, दरोडा इत्यादी १२३ गुन्ह्यांची नोंद झालेली असणे, राज्यात लहान बालकांच्या अपहरणात भयंकर वाढ झालेली असून त्यामुळे पालकांत पसरलेले भितीचे वातावरण, लहान बालिकांवर करण्यात येत असलेले बलात्कार, बदलापूर येथे पुन्हा चार वर्षीय बालिकेवर बलात्कार केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, "स्पा" च्या नावाखाली राज्यात ठिकठिकाणी सुरु असलेला देह विक्रिचा व्यवसाय, राज्यात ऑनलाईन जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात सुद्धा या जुगाराचे लोण पसरलेले असणे, ड्रग्स व अंमली पदार्थांच्या विक्रीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगाव येथील एका वीस वर्षीय तरुणीची तीन लाख रुपयांना विक्री केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, राज्यातील महिलांवर वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे महिलावर्गात पसरलेले भितीचे वातावरण, यांना आळा घालणाऱ्या व महिलांना कायदेशीर संरक्षण देणाऱ्या शक्ती कायद्याची अद्यापही अंमलबजावणी करण्यात न येणे, एकंदरीतच राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिस प्रशासनावरील शासनाचे सुटलेले नियंत्रण, महावितरण कंपनीच्या राज्यातील जालना, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव इत्यादी जिल्ह्यातील मंडळ कार्यालये खाजगी कंपन्यांना देण्याचा निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशनने सदर निर्णयास केलेला तीव्र विरोध, नागपूर, जळगाव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खाजगी विद्युत कंपन्यांनी कराराच्या मुदतीआधीच कामे सोडून देणे, ओरिसा व उत्तर प्रदेशमध्येही खाजगी विद्युत कंपन्यांनी वीज वितरणामधून माघार घेणे, असे असतांनाही राज्यात विद्युत कंपनीच्या खाजगीकरणाचा आग्रह असणे, पश्चिम महाराष्ट्रात ३११ कोटी रुपयांची विद्युतमंडळाची थकबाकी असणे, "मागेल त्याला कृषी सौरपंप" योजनेच्या लाभासाठी निवड झाल्यानंतर पैसे भरुनही सौरपंप मिळत नसल्याने राज्यातील सुमारे अडीच लाख शेतकरी त्रस्त असणे, मुंबई शहराच्या पूर्व व पश्चिम उपनगरांमध्ये ६० ते ७० वर्षापूर्वीच्या अनेक जुन्या व जीर्ण झालेल्या अनेक चाळी/इमारती असणे, मुंबई शहराप्रमाणे उपनगरांसाठी इमारत व घर दुरुस्ती मंडळ नसणे, त्या इमारती केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत असणे, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे जीवन धोक्यात आलेले असणे, एसआरए योजनांमध्ये अशा जुन्या चाळीतील वरच्या मजल्यावरील रहिवाश्यांना सामावून घेण्यात येत नसणे, ज्यामुळे पुनर्विकासामध्ये येणाऱ्या प्रचंड अडचणी, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, महसूल, बांधकाम, आरोग्य, शिक्षण, नगरविकास, सामाजिक न्याय, जलसंधारण तसेच इतर अनेक विभागांमध्ये कामे मंजूर करण्यासाठी, परवाने देण्यासाठी, कंत्राटे देण्यासाठी तसेच विविध शासकीय

योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असणे, अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार उघडकीस येऊनही दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्याने अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे, शासनाच्या औषध खरेदीत होत असलेली अनियमितता आणि भ्रष्टाचार, तसेच महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात होत असलेला भ्रष्टाचार, परिणामी सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून शासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, राज्यातील विविध विभागांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत राज्यशासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

**बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ८)**

**(१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत

असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करुन बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट कॉंक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळयांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची

आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जळगाव शहरातील ऑप्टिकल दुकानांमध्ये नागरिकांच्या डोळयांच्या वैद्यकीय उपचाराची पध्दत अत्यंत क्रूर आणि संतापजनक असणे, चष्म्याच्या व्यवसायाचे रूपांतर एका अनियंत्रित 'बाजारात' झाले असून केवळ व्यावसायिक फायद्यासाठी तांत्रिक ज्ञान नसलेले लोक नेत्ररोग तज्ज्ञ बनून वावरत असणे, या सदोष तपासणीमुळे समाजात नेत्रविकारांचे प्रमाण वाढून नागरिकांना शारीरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत असणे, या प्रकरणात आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासकीय यंत्रणेने कमालीचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येणे, विनापरवाना डोळे तपासणी करणाऱ्या दुकानांवर अंकुश ठेवण्यात ही यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरलेली असणे, शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ अशा अनधिकृत केंद्रांची चौकशी करून ती बंद करावीत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी नागरीकांकडून होत असेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात मोठया प्रमाणात आर्थिक फसवणूकीचे सायबर गुन्हे घडत असणे, या फसवणूकीसाठी सोशल मिडीयाचा वापर होत असणे, सोशल मिडीयाच्या माध्यमातून विविध जाहिरातीव्दारे अमिषे दाखवून ही फसवणूक केली जात असणे, या आमिषांमुळे अनेक जणांची फसवणूक होत असणे, कित्येकदा या फसवणूक करणाऱ्या टोळया राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरुन गुन्हे करीत असणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाहीसाठी मर्यादा येत असणे, अनेक गुन्हे उघडकीस येत नसणे, त्यामुळे शासनाने या आर्थिक फसवणूकीच्या सायबर गुन्हयांना प्रतिबंधासाठी बहुवर्षीय राज्यव्यापी सायबर पूर्वसूचना, इशारा व नागरीक जनजागृती चौकट तयार करण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून कार्यवाहीत होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण होत असलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सार्वजनिक वाहतूक नियोजन व व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक दृष्टीकोनातून चंद्रपूर महानगरमध्ये रिंगरोडची असलेली आवश्यकता, नवीन वाहतूक मार्गामुळे नवीन वसाहती, औद्योगिक क्षेत्र, व्यावसायिक आस्थापनांना जागा मिळू शकणे, चंद्रपूर शहर औद्योगिक व खनिज समृध्द भाग असल्यामुळे रिंगरोड असल्यास माल वाहतूक अंतर्गत रस्त्यापेक्षा बाहेरून जाईल, त्यामुळे उत्पादनांची वाहतूक अधिक

जलद व सुरक्षित होणे शक्य होईल, शहराची वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण या पार्श्वभूमीवर रिंगरोडचे बांधकाम करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरात विशेषत: बोरीवली परिसरात अंमली पदार्थांचे वाढत असलेले प्रमाण, विविध भागात ड्रग्स, मद्यपान करणे, सिगारेट व इतर अंमली पदार्थांची विक्री खुले आम होत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून सातत्याने होत असणे, ही परिस्थिती केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाच्या नैतिक व सामाजिक आरोग्याशी निगडीत असणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात फळे, मिठाई, मिंट इत्यादी फ्लेवरयुक्त वेप उत्पादने लहान मुलांना आकर्षित करणे, तसेच ई-सिगारेटची (वेप) अवैध खुलेआम विक्री होत असल्याने विशेषत: शालेय/कॉलेजचे विद्यार्थी याच्या विळख्यात अडकणे, त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वातावरणावर, कुटुंबव्यवस्थेवर तसेच समाजातील सुरक्षिततेवर याचा परिणाम होणे, या संदर्भात प्रशासनाकडे माहिती असतानाही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे नागरीकांच्या मनात खंत व्यक्त होणे, झेपटो, ब्लिंकइट यांसारख्या ऑनलाईन वितरण प्रणालीव्दारे अंमली पदार्थ सेवनासाठी वापरले जाणारे विविध साहित्य सहज उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे नागरीकांकडून ऑनलाईन विक्री करण्यास बंदी घालण्याची होत असलेली मागणी, मुंबई क्राईम ब्रँचने सन २०२५ मध्ये दहीसर, सांताक्रुझ, कालबादेवी, कम्बाला हिल इत्यादी ठिकाणी चीनमधून तस्करी केलेल्या रुपये ३२ लाखांच्या ई-सिगारेट मुद्दे मालासह जप्त करणे, मुंबईसह राज्यभरातील शाळा-कॉलेजांच्या ५०० मीटर परिसरात व सार्वजनिक ठिकाणी विशेष तपासणी मोहिम राबवून अवैध विक्री करणाऱ्या दुकानांवर, पुरवठादारांवर व ऑनलाईन विक्रेत्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, डब्ल्यू/सीडीसी डेटा व चीन तस्करीच्या धोक्यावर आधारीत व्याख्याने, सोशल मिडीया अभियानाव्दारे शालेय/कॉलेजच्या विद्यार्थी/पालक तसेच जनतेमध्ये जन-जागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्रमांक ९ व १०)**

**(९) श्री. शंकर जगताप, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पिंपरी-चिंचवड शहराची वाढती गरज लक्षात घेता मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी मिळावे अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २ डिसेंबर २०२३ मध्ये शासनाकडे करणे, शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिन १३५ लिटर पाण्याची गरज भासणे, सध्या पवना धरणातून ५१० एमएलडी आणि एमआयडीसी कडून ३० एमएलडी आणि आंध्रा धरणातून ७० एमएलडी एवढे असा दररोज ६१० एमएलडी पाणी दिवसा उद्योग नगरीत नागरिकांना पुरविण्यात येणे, शहराची

लोकसंख्या आगामी १० वर्षात दुप्पटीने वाढ होणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये हिंजवडी, मान, मारुंजी, जांभे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश झाल्यास शहराला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता, चिंचवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पाण्याचे स्त्रोत्र याबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून एकत्रित अहवाल तयार करणे, मुळशी धरणातून बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या मोजमापासाठी मीटर बसविणे, मुळशी धरणातील पाणी आरक्षित केल्यास तसेच धरणाची उंची वाढविल्यास पुणे शहरासह पिंपरी चिंचवड पीएमआरडी येथील रहिवाशांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल, नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत भामा आसखेड धरणातून १३७ एमएलडी पाणी उचलणे, शेतजमीन पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून सविस्तर अहवाल तयार करून उद्योगनगरीला पाणीपुरवठा देण्याबाबत सकारात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुळशी धरणातून महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जलसंपदा विभागात २१५ एम.एल.डी. पाण्याची मागणी व आरक्षणाची मागणी, मुळशी धरणातील टाटा पॉवर मालकीच्या तीनशे मेगाब्लॉक क्षमतेचे हायड्रोपॉवर जनरेशन करार हा सन २०३१ मध्ये संपत असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड पुणे सह पीएमआडीए हद्दीत वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता आमाती ३० वर्षाचे नियोजन करण्यासाठी कमीत कमी १० टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची व्यवहारता तपासण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत वरळी पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात येणे, उक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमध्ये कोणकोणाची नेमणूक करण्यात आली तसेच सदर सल्लागार समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असेल तर त्यावर शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर राज्यातील विविध जिल्हयातून (मुंबई शहर व उपनगरासह) भरती झालेले मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार, हवालदार आदिंना सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्तीवेतनातून मालकी हक्काचे मुंबई सारख्या शहरात घर घेणे शक्य नसल्याने त्यांना शहरात मालकी हक्काची घरे देण्याची आवश्यकता, त्याकरिता मुंबई उपनगरात मालकी हक्काची घरे उपलब्ध करुन देण्याबाबत स्वतंत्र व ठोस पोलीस हाऊसिंग धोरण जाहीर करण्यात यावे, तसेच पोलीस बाधवांनी स्थापन केलेल्या पोलीस परिवार गृहनिर्माण सहकारी संस्थांना मालकी हक्काचे घरे अथवा भूखंड देण्यासाठी विशेष सवलतीसह योजना राबविण्याची आवश्यकता, सेवानिवृत्त मुंबई पोलीस अधिकारी /अंमलदार व त्यांच्या कुटुंबियावर लादण्यात येणारे दंडणीय अनुज्ञाप्ती शुल्क पुर्णत: माफ करण्याची आवश्यकता, पोलीसांच्या मालकी हक्काच्या घरांसाठी आरक्षित असलेल्या

भूखंडावर पोलीसासाठी घरे बांधण्यात यावी, सदर भूखंड खाजगी विकासकांच्या ताब्यात देण्यात येऊ नये अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नाशिक महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन पेस्ट सार्वजनिक ठिकाणची साफसफाई, पाणी पुरवठा, मल:निसारण, वाहन चालक पुरवठा आधी ठेकेदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले जात असताना प्रति महिन्याला या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून विशिष्ट रक्कम रोख स्वरूपात परत घेतली जात असणे, ठेकेदारी कर्मचारी म्हणून कामकाज करणारा कर्मचारी गरीब घरातील असल्याने त्याला कामाची नितांत आवश्यकता असणे, ठेकेदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या गरजेचा गैरफायदा घेतला जात असणे, याबाबत लक्षवेधी सूचना क्रमांक १५४४ उपस्थित केली असता मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत निश्चित यंत्रणा केली जाईल व गरीब कर्मचाऱ्यांची लूट होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल तसेच या प्रकरणात एसआयटी स्थापन केली जाईल असे आश्वासन देणे, माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर अनेक कर्मचाऱ्यांनी नाशिक महानगरपालिकेकडे तक्रारी करणे, त्याचप्रमाणे पोलीस ठाण्यात देखील गुन्हा नोंदवण्यात येणे, परंतु या गरीब मुलांची आर्थिक अडवणूक करून त्यांनी केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी ठेकेदार व त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींकडून दबाव निर्माण होत असणे, या प्रकरणा संदर्भात अटकपूर्व जामीन मंजूर करताना कर्मचाऱ्यांच्या लाभात कुठलाही हस्तक्षेप करू नये असे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले असताना देखील सदर जामीन रद्द करून कारवाई केली जात नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत १३९१.७१ हेक्टर क्षेत्राचा समावेश असून मौजा पडोली (भाग), खुटाळा (भाग), कोसारा व दाताळा ही गावे या योजनेत अंतर्भूत असणे, दिनांक ३० जून १९९८ रोजी विकास आराखड्यास शासन मान्यता मिळाली असून योजना १ सप्टेंबर १९९८ पासून अंमलात येणे, प्रकल्पाची मूळ किंमत रु. २२२८.७७३ लक्ष इतकी असणे, नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत मूलभूत सुविधा, गृहनिर्माण व सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्यात महत्त्वपूर्ण प्रगती झालेली असणे, तथापि, रस्ते दुरुस्ती, प्रलंबित निधी प्रतिपूर्ती व उर्वरित आरक्षित क्षेत्रांचा नियोजित विकास या बाबी तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"हद्दवाढीला पर्याय म्हणून कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणे, मात्र स्थापनेनंतर आठ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधित ४२ गावांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव कायम असणे, केवळ बांधकाम परवानग्या देणे व किरकोळ कारवाई करणे यापुरते प्राधिकरणाचे कार्य मर्यादित असणे, कलम ४२ अंतर्गत स्थापन प्राधिकरणास शासनाचा थेट निधी उपलब्ध होत नसल्याने विकास कामे ठप्प होणे, त्यामुळे एमआरटीपी कायद्यातील कलम ४० अंतर्गत विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून शासनाचा विशेष निधी, शासकीय जमिनींचे हस्तांतरण व स्वतंत्र विकास आराखडा मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे मेट्रोपोलिटन रिजन हा राज्याच्या आर्थिक वाढीचा प्रमुख केंद्रबिंदू असणे, आयटी उद्योग, ऑटोमोबाईल क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असणे, Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) कार्यक्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना मूलभूत पायाभूत सुविधांची उभारणी मात्र त्या वेगाने झालेली नसणे, प्रमुख मार्गावर तीव्र वाहतूक कोंडी, इंद्रायणी, पवना, मुळा नदीचे वाढते प्रदूषण, हवा व पाणी प्रदूषणात वाढ, अनियोजित बांधकामे व विकासकामे, औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांचा अभाव, वाढत्या मागणीमुळे वीज वितरण यंत्रणेवर ताण, Maha Metro मार्फत पुणे मेट्रो सुरू असून संपूर्ण PMR क्षेत्र अद्याप विस्तारीत झालेले नसणे, हिंजवडी, चाकण, तळेगाव, वाघोली, लोणीकंद या भागांसाठी मेट्रो विस्ताराचा कालबद्ध कार्यक्रम, रिंगरोड व मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब प्रकल्पांची सद्यस्थिती काय असा प्रश्न पडणे, PMPML सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, इंद्रायणी, पवना, मुळा या नद्यांचा उगम ते संगम असा नदीसुधार कार्यक्रम हाती घेऊन सर्वच नद्याचे जतन आणि संवर्धन करण्याची आवश्यकता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविण्याची तसेच MIDC क्षेत्रातील औद्योगिक सांडपाणी नियंत्रण करण्याची आवश्यकता, वाढत्या वाहनसंख्येमुळे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने धोरण आखण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात वाढत्या शहरीकरणासाठी स्वतंत्र नियोजन यंत्रणा उभारणे, बेकायदेशीर बांधकामांवर गेल्या तीन वर्षांत कोणत्या प्रकारची कारवाई केली याचा अहवाल सादर करणे, नवीन औद्योगिक क्लस्टर नियोजन करणे, नवीन उपकेंद्रे उभारणीचा आराखडा तयार करणे, सौर व पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) श्री. रोहित पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सांगली शहरात तसेच तासगाव व विटा (जि. सांगली) परिसरामध्ये अमली पदार्थांचे वाढत असलेले जाळे, विटा एम.आय.डी.सी. परिसरात पोलिसांनी १४.५ किलो मेफेड्रोन नावाचे ड्रग्ज जप्त करत सुमारे २९ कोटींचा मोठा ड्रग्ज उत्पादन रॅकेट उद्ध्वस्त करणे, जिल्हा स्तरावर अमली पदार्थांचे उत्पादन व वितरण साखळी सक्रिय असल्याचे उघड होणे, परंतु जिल्ह्यामध्ये बाहेरून येणारे अंमली पदार्थाचे जाळे देखील प्रस्थापित झालेले असणे, त्याचप्रमाणे तासगाव तालुक्यात ग्रामीण भागात गांजाची लागवड व जप्तीच्या घटना समोर आल्याने अमली पदार्थांचे जाळे लहान शहरांपासून गावांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येणे, अंमली पदार्थांच्या सेवनामध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग, शाळा-महाविद्यालयीन वयोगटातील युवक व्यसनाधीनतेकडे वळत असल्याची बाब उघडकीस येणे, व्यसनाधीनतेमुळे चोरी, मारामारी, लहान स्वरूपातील गुन्हे, टोळी संस्कृती व हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याचा धोका निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कडक पावले उचलन्याची आावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) श्री. निलेश राणे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंब्रड सारमळे येथील धरणाचे काम मृद व जलसंधारण विभागामार्फत होत असून या कामाला १९९६ साली प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ३० वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप प्रकल्प पूर्ण झालेला नसणे, त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत चाललेली असणे, यासंदर्भात विधानसभा सभागृहात विषय उपस्थित केला असता मा.मंत्री महोदयांनी प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला तात्काळ प्रशासकीय मंजूरी देऊन धरणाच्या कामास सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन दिलेले असतानाही अदयाप धरणाच्या वाढीव खर्चाला मंजूरी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, आंब्रड धरणासंदर्भात सभागृहात विषय उपस्थित केल्यानंतर फक्त एकदाच बैठक झाली त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु झाले असले तरी जुन्या कामाबाबत कुठलही ऑडीट झालेले नसणे, काम १०० टक्के निकृष्ट सुरु असणे, एकदाही कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यकारी अभियंता हे प्रत्यक्षात काम सुरू असलेल्या ठिकाणी गेलेले नसणे, तसेच ठेकेदार पी. के. कोंडेकर याने धरणाच्या बुडीत क्षेत्रातच अधिकृतरीत्या काळया दगडाची क्वारी खोदून तो दगड विकून कोट्यवधींचा शासनाचा महसूल बुडवलेला असणे, धरणाचे झालेले काम अत्यंत निकृष्ट असून धरणाचा मुख्य बंधारा कित्येक फूट खचला असणे, दहा वर्षांनंतर बंधाऱ्यावर उगवलेल्या झाडांची तोड करण्यात आलेली असणे, प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा जास्त देयकाची रक्कम काढण्यात आलेली असणे, धरणात वापरल्या जाणाऱ्या मातीचे कुठलेही परिक्षण झालेले नसून उपलब्ध असेल ती माती धरणाच्या बंधाऱ्यात वापरली जात असणे, सदरील धरणाचे काम तात्काळ थांबवून झालेल्या कामाची चौकशी करावी, ठेकेदाराला काळया यादीत टाकून धरणासाठी नवीन ठेकेदार नियुक्त करण्यात यावा, तसेच कुडाळ

तालुक्यातील भडगाव बुद्रुक येथील सुरू असलेल्या धरणाच काम हे ३०% पूर्ण झाले असून अद्याप शेतकऱ्यांना कुठलाही मोबदला मिळालेला नसणे, येथील शेतकऱ्यांची किमान ७ कोटी २३ लाखांची नुकसान भरपाई प्रलंबित असणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ११ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.